नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका
अंशदानाची रक्कम जमा करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४/१०/२०१६.

## आ दे श

विषय:- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका
अंशदानाची रक्कम जमा करण्याबाबत...

लोकसभा व विधानसभेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात याकरिता भारताच्या संविधानामध्ये १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यामध्ये एक स्वतंत्र अशा राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. राज्यामध्ये कार्यरत सुमारे २८,००० स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ( महानगरपालिका २६, नगर परिषदा-२३०, नगर पंचायती १०८,जिल्हा परिषदा-३४, पंचायत समित्या ३५१, ग्रामपंचायती २७,७८१) निवडणुका दर ५ वर्षांनी घेण्यात येऊन सुमारे २.५ लाख लोकप्रतिनिधी निवडले जातात.

३. या निवडणुकीसाठी सर्व खर्च करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची किंवा शासनाची खालीलप्रमाणे आहे :-

३.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबतीत (महानगरपालिका व नगरपरिषदा/नगरपंचायती) खालील अधिनियमातील तरतुदीनुसार त्या त्या नागरी संस्थांची :-

(i) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ११८(ए)

(ii) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८८ (ए)

(iii) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अंतर्गत महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६ चा नियम ६४

३.२ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत (जिल्हा परिषद/पंचायत समिती, ग्रामपंचायत) राज्य शासनाची

४. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या वेतन व वेतनेतर खर्चाची जबाबदारी राज्य शासनाची असली तरी या तरतुदीमधून कोणत्याही कल्पक व नवीन उपाययोजना करणे शक्य होत नाही व तसेच निवडणुकीच्यावेळी ही तरतूद अत्यंत अपुरी पडते. हे लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने अधिनियमातील वरील तरतुदींनुसार (परिच्छेद-३.१) वेळोवेळी नगर परिषदा/नगर पंचायती व महानगरपालिका यांच्याकडून अंशदानाच्या स्वरुपात निधी गोळा केलेला आहे व त्यातूनच नवीन/कल्पक बाबींवर आवश्यक तो खर्च केला आहे. उदा. २००१ मध्ये आकस्मिक खर्चासाठी, २००४ मध्ये पहिल्यांदाच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र खरेदी करण्यासाठी व नंतर २०१० ते २०१३ मध्ये मतदारांच्या सुविधेसाठी वेब साईट, मतदार जागृती अभियान, इत्यादीसाठी.

५. दरम्यानच्या काळात, मा. सर्वोच्च न्यायालयाने २००६ साली श्री. किशनसिंग तोमर विरुध्द इतर, अहमदाबाद महानगरपालिका, या प्रकरणामध्ये निवाडा देताना खालील बाबी स्पष्ट केलेल्या आहेत :-

"राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असून, त्यांचा दर्जा, शक्ती व अधिकार भारत निवडणूक आयोगाशी समतुल्य आहे. तसेच राज्य शासनास आयोगाचे निर्देश पाळणे बंधनकारक आहे."

६. वरील आदेशावरून स्पष्ट होते की, राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असून, निवडणूकविषयक सर्व कामे राज्य निवडणूक आयोगाच्या Assessment प्रमाणे होणे आवश्यक आहे. यामध्ये कोणतेही कृत्य ज्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेस बाधा पोहोचते, हे संविधानाच्या विरुध्द ठरणारे आहे.

७. काळाच्या बदलत्या गरजेप्रमाणे निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे व कल्पक उपाययोजना राबविणे राज्य निवडणूक आयोगाला आवश्यक झालेले आहे. राज्य निवडणूक आयोगाने २०१४-१५ पासून संगणकामार्फत नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरण्यास व मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन, इत्यादी कामे करण्यास सुरुवात केलेली आहे. तसेच कमी प्रमाणात असलेले संशोधन लक्षात घेता विद्यापीठे व ख्यातनाम संस्था (उदा. गोखले इन्स्टिटयूट, इत्यादी) च्या मदतीने संशोधन करण्यास सुरुवात केलेली आहे. असे नवनवीन प्रकल्प राबविणे किंवा नवीन तंत्रज्ञानाची मदत घेण्याकरिता १ सप्टेंबर, २०१४ ते ३१ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या आहेत किंवा होणार आहेत

त्यांच्याकडून राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर अंशदान गोळा करण्याची बाब विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

## आदेश

८.

८.१ राज्य निवडणूक आयोग ठरविल त्या सर्व कल्पक उपाययोजना, नवीन प्रयोग, प्रशिक्षण, अथवा अन्य तातडीच्या बाबी, इत्यादीसाठी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी खाली दर्शविल्याप्रमाणे अंशदान (१ सप्टेंबर, २०१४ ते ३१ ऑगस्ट, २०१९ या कालावधीकरिता) राज्य निवडणूक आयोगाकडे जमा करावे :-

| स्थानिक स्वराज्य संस्था | वर्ग | अंशदान (प्रति मतदार) |
|---|---|---|
| महानगरपालिका | "अ+" व "अ" | रुपये २.००/- |
| | "ब" | रुपये २.००/- |
| | "क" | रुपये १.५०/- |
| | "ड" | रुपये १.५०/- |
| नगर परिषदा | "अ" | रुपये १.५०/- |
| | "ब" | रुपये १.००/- |
| | "क" | रुपये १.००/- |
| नगर पंचायत | | रुपये ०.५०/- |

८.२ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागील सार्वत्रिक निवडणुकीतील मतदारांच्या संख्येनुसार अंशदानाची रक्कम राज्य निवडणूक आयोगाच्या बँक खात्यात हे आदेश निर्गमित झाल्यापासून एका महिन्यात जमा करावी.

८.३ वरील अंशदान राज्य निवडणूक आयोगाच्या खालील खात्यात जमा करण्यात यावे :-

(i) खातेदाराचे नाव - लेखाधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई (Account Officer, State Election Commission, Mumbai)

(ii) खात्याचे स्वरुप - Current Account

(iii) बँकेचे नाव - State Bank of India, Madam Cama Road, Nariman Point, Mumbai-21.

(iv) IFS Code - SBIN0008586

(V) खाते क्रमांक- Current Account No. 10768099138

८.४ वरील खात्यावर अंशदान जमा केल्यानंतर त्याच्या Pay-in-slip अथवा NFFT, इत्यादीची झेरॉक्स प्रत संबंधित विभागीय आयुक्त व राज्य निवडणूक आयोग यांच्या कार्यालयास ई-मेल व टपालाद्वारेही पाठवावी.

८.५ महानगरपालिकांनी अंशदान जमा केल्यानंतर त्याच्या Pay-in-slip अथवा NFFT, इत्यादीची झेरॉक्स प्रत थेट राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावी.

८.६ विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या महसूल विभागातील सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींनी अंशदान जमा केल्याबाबतचा हिशोब एकत्रितरित्या सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये विहित केल्यानुसार राज्य निवडणूक आयोगास पाठवावा.

८.७ संबंधित निवडणूक कार्यासन व रोख शाखेने समन्वयाने सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अंशदान वेळेवर प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

९. वरील अंशदान कोणत्याही परिस्थितीत इतरत्र दुसऱ्या कोणत्याही खात्यात वळते करण्यात येऊ नये.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( एस. एम. चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
३. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
५. सर्व महानगरपालिका आयुक्त
६. सर्व जिल्हाधिकारी
७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
८. सर्व नगर परिषदा/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती.

F:\राज्य निवडणूक आयुक्तांनी डिक्टेट केलेली पत्र\अंशदानाबाबत ४.१०.२०१६.docx

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ४४ /का-५, दिनांक- १४/१०/२०१६ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-१

दिनांक- ..................

विभागीय आयुक्त -............ विभाग

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ४४/का-५, दिनांक- १४/१०/२०१६ अनुसार............ महसूल विभागातील सर्व नगर परिषदा/नगरपंचायतींनी अंशदानाची रक्कम जमा केली असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषद/ नगर पंचायतीचे नाव | मागील सार्वत्रिक निवडणुकीतील मतदारांची संख्या | अंशदानाची एकूण रक्कम | राज्य निवडणूक आयोगाच्या खात्यावर जमा केल्याचा दिनांक | शेरा (Pay-in slip / NEFT यांचा तपशील) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

विभागीय आयुक्त,

.................... विभाग

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका सप्टेंबर २०१९ ते ऑगस्ट, २०२४ अंशदानाची रक्कम जमा करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२०

## आ दे श

विषयः- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका सप्टेंबर, २०१९ ते ऑगस्ट, २०२४ अंशदानाची रक्कम जमा करण्याबाबत...

लोकसभा व विधानसभेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात याकरिता भारताच्या संविधानामध्ये १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून महाराष्ट्रासह देशातील प्रत्येक राज्यामध्ये एक स्वतंत्र अशा राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. राज्यामध्ये कार्यरत सुमारे २८,००० स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (२७ महानगरपालिका, २४१ नगर परिषदा, १२८ नगर पंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या, २७,७८१ग्रामपंचायती) निवडणुका दर ५ वर्षांनी घेण्यात येऊन सुमारे २.५ लाख लोकप्रतिनिधी निवडले जातात.

३. या निवडणुकीसाठी सर्व खर्च करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची किंवा शासनाची खालीलप्रमाणे आहे :-

३.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबतीत (महानगरपालिका व नगरपरिषदा/नगरपंचायती) खालील अधिनियमातील तरतुदीनुसार त्या त्या नागरी संस्थांची :-

(i) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ११८(ए)

(ii) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८८ (ए)

(iii) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अंतर्गत महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६ चा नियम ६४

३.२ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत (जिल्हा परिषद/पंचायत समिती, ग्रामपंचायत) राज्य शासनाची

४. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या वेतन व वेतनेतर खर्चाची जबाबदारी राज्य शासनाची असली तरी या तरतुदीमधून कोणत्याही कल्पक व नवीन उपाययोजना करणे शक्य होत नाही व तसेच निवडणुकीच्यावेळी ही तरतूद अत्यंत अपुरी पडते. हे लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने अधिनियमातील वरील तरतुदींनुसार (परिच्छेद-३.१) वेळोवेळी नगर परिषदा/नगर पंचायती व महानगरपालिका यांच्याकडून अंशदानाच्या स्वरुपात निधी गोळा केलेला आहे व त्यातूनच नवीन/कल्पक बाबींवर आवश्यक तो खर्च केला आहे. उदा. २००१ मध्ये आकस्मिक खर्चासाठी, २००४ मध्ये पहिल्यांदाच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र खरेदी करण्यासाठी व नंतर २०१० ते २०१३ मध्ये मतदारांच्या सुविधेसाठी वेब साईट, मतदार जागृती अभियान, इत्यादीसाठी, तसेच त्यानंतर सन २०१६ मध्ये सर्व कल्पक उपाययोजना, नवीन प्रयोग, प्रशिक्षण, अथवा अन्य तातडीच्या बाबी, इत्यादीसाठी.

५. दरम्यानच्या काळात, मा. सर्वोच्च न्यायालयाने २००६ साली श्री. किशनसिंग तोमर विरुध्द इतर, अहमदाबाद महानगरपालिका, या प्रकरणामध्ये निवाडा देताना खालील बाबी स्पष्ट केलेल्या आहेत :-

> "राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असून, त्यांचा दर्जा, शक्ती व अधिकार भारत निवडणूक आयोगाशी समतुल्य आहे. तसेच राज्य शासनास आयोगाचे निर्देश पाळणे बंधनकारक आहे."

६. वरील आदेशावरून स्पष्ट होते की, राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असून, निवडणूकविषयक सर्व कामे राज्य निवडणूक आयोगाच्या Assessment प्रमाणे होणे आवश्यक आहे. यामध्ये कोणतेही कृत्य ज्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेस बाधा पोहोचते, हे संविधानाच्या विरुध्द ठरणारे आहे.

७. काळाच्या बदलत्या गरजेप्रमाणे निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे व कल्पक उपाययोजना राबविणे राज्य निवडणूक आयोगाला आवश्यक झालेले आहे. राज्य निवडणूक आयोगाने २०१४-१५ पासून संगणकामार्फत नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरण्यास व मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन, इत्यादी कामे करण्यास सुरुवात केलेली आहे. तसेच कमी प्रमाणात असलेले संशोधन लक्षात घेता विद्यापीठे व ख्यातनाम संस्था (उदा. गोखले इन्स्टिटयूट, इत्यादी) च्या मदतीने संशोधन करण्यास सुरुवात केलेली आहे. असे नवनवीन प्रकल्प राबविणे किंवा नवीन तंत्रज्ञानाची मदत घेण्याकरिता १ सप्टेंबर, २०१९ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या आहेत किंवा होणार आहेत त्यांच्याकडून राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर अंशदान गोळा करण्याची बाब विचाराधीन होती. सर्व बाबींचा

विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

८. **आदेश**

८.१ राज्य निवडणूक आयोग ठरविल त्या निवडणुकीशी निगडीत सर्व कल्पक उपाययोजना, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, अभ्यास दौरे, संशोधन व विश्लेषण, नवीन प्रयोग तसेच इतर तत्सम उपक्रम, निवडणुकीशी संबंधित साहित्य खरेदी, मतदान यंत्र खरेदी अथवा देखभाल दुरुस्ती, अन्य तातडीच्या बाबी, इत्यादीसाठी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी खाली दर्शविल्याप्रमाणे अंशदान (१ सप्टेंबर, २०१९ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीकरिता) राज्य निवडणूक आयोगाकडे जमा करावे :-

| स्थानिक स्वराज्य संस्था | वर्ग | अंशदान (प्रति मतदार) |
|---|---|---|
| महानगरपालिका | "अ+" व "अ" | रुपये २.५०/- |
| | "ब" | रुपये २.५०/- |
| | "क" | रुपये १.५०/- |
| | "ड" | रुपये १.५०/- |
| नगर परिषदा | "अ" | रुपये १.५०/- |
| | "ब" | रुपये १.००/- |
| | "क" | रुपये १.००/- |
| नगर पंचायत | | रुपये ०.५०/- |

८.२ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागील सार्वत्रिक निवडणुकीतील मतदारांच्या संख्येनुसारतर दरम्यानच्या कालावधीमध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या नवनिर्मित स्थानिक स्वराज्य संस्थांनी पहिल्या निवडणुकीमधील मतदारांच्या संख्येनुसार अंशदानाची रक्कम राज्य निवडणूक आयोगाच्या बँक खात्यात हे आदेश निर्गमित झाल्यापासून एका महिन्यात यथास्थिती नवनिर्मित स्थानिक स्वराज्य संस्थांनी अंतिम मतदार यादी प्रसिध्दीनंतर एका महिन्यात जमा करावी.

८.३ वरील अंशदान राज्य निवडणूक आयोगाच्या खालील खात्यात जमा करण्यात यावे :-

(i) खातेदाराचे नाव - लेखाधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
(Account Officer, State Election Commission, Mumbai)

(ii) खात्याचे स्वरुप - Current Account

(iii) बँकेचे नाव - State Bank of India, Madam Cama Road,
Nariman Point, Mumbai-21.

(iv) IFS Code - SBiN0008586

(V) खाते क्रमांक- Current Account No. 10768099138

८.४ वरील खात्यावर अंशदान जमा केल्यानंतर त्याच्या Pay-in-slip अथवा NFFT, इत्यादीची झेरॉक्स प्रत संबंधित जिल्हाधिकारी व राज्य निवडणूक आयोग यांच्या कार्यालयास ई-मेल व टपालाद्वारेही पाठवावी.

८.५ महानगरपालिकांनी अंशदान जमा केल्यानंतर त्याच्या Pay-in-slip अथवा NFFT, इत्यादीची झेरॉक्स प्रत थेट राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावी.

८.६ जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींनी अंशदान जमा केल्याबाबतचा हिशोब एकत्रितरित्या सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये विहित केल्यानुसार राज्य निवडणूक आयोगास पाठवावा.

८.७ संबंधित निवडणूक कार्यासन व रोख शाखेने समन्वयाने सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अंशदान वेळेवर प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

९. वरील अंशदान कोणत्याही परिस्थितीत इतरत्र दुसऱ्या कोणत्याही खात्यात वळते करण्यात येऊ नये.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१. अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
३. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
५. सर्व महानगरपालिका आयुक्त
६. सर्व जिल्हाधिकारी
७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
८. सर्व नगर परिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी/सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती.

D:\MAHALE\ATUL\अंशदान जमा करणेबाबत.docx

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४४ /का.५, दि१०/२/२०२०
सोबतचे सहपत्र.

## परिशिष्ट-१

जिल्हा -------------------

दिनांक- / / २०२०

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक- रानिआ/ मनपा-२०१६/प्र.क्र.४४ /का.५, दि. १०/२/२०२० अनुसार जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा / नगरपंचायतींनी अंशदानाची रक्कम जमा केली असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | जिल्हा | नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव | मागील सार्वत्रिक निवडणुकीतील मतदारांची संख्या | अंशदानाची एकूण रक्कम | राज्य निवडणूक आयोगाच्या खात्यावर जमा केल्याचा दिनांक | शेरा (Pay-in slip / NEFT यांचा तपशील) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

जिल्हाधिकारी

-----------------